# गर्भपाताविषयी वस्तुस्थिती

## भारतात गर्भपात कायदेशीर आहे. पण हजारो स्त्रिया दरवर्षी असुरक्षित गर्भपातामुळे मरण पावत आहेत.

अनेक देशांमध्ये गर्भपाताला कायदेशीर मान्यता मिळाल्यावर असुरक्षित गर्भपातामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी होते. परंतु भारतात गत ४०वर्षांपेक्षा जास्त काळ गर्भपाताला कायदेशीर मान्यता असली तरी दरवर्षी असुरक्षित गर्भपातांमुळे सुमारे ४६०० मृत्यू होतात. प्रशिक्षित आणि उपलब्ध असलेले गर्भपात सेवा पुरवठादार, सुरक्षित गर्भपात सेवांच्या कायदेशीर उपलब्धतेबाबत अपुरे ज्ञान आणि गर्भपाताबाबत असलेला कलंक यांच्यामुळे अनेक स्त्रियांना भोंदू डॉक्टरांमार्फत असुरक्षित गर्भपात करण्यास भाग पडते. भारतातील सुमारे ६.४ दशलक्ष गर्भपातांपैकी ३.६ दशलक्ष (५६ टक्के) असुरक्षित आहेत. मध्य प्रदेश या भारतातील सर्वात मोठ्या राज्यांपैकी एकात केवळ तीन टक्के प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि १९ टक्के आरोग्य उपकेंद्रे सुरक्षित गर्भपात सेवा पुरवतात. (बॅनर्जी २०१२)

## गर्भपात ही सोपी आणि सुरक्षित वैद्यकीय प्रक्रिया आहे.

- जागतिक आरोग्य संघटनेने असुरक्षित गर्भपाताची व्याख्या केली असून त्यानुसार ही प्रक्रिया सुरक्षितरित्या पार पाडण्यासाठी योग्य कौशल्ये किंवा प्रशिक्षण नसलेल्या व्यक्तीने किंवा किमान वैद्यकीय दर्जा प्राप्त नसलेल्या सुविधांमध्ये किंवा दोन्ही प्रकारे गर्भपाताची प्रक्रिया पार पाडणे असा होतो. (डब्ल्यूएचओ २०१३)
- गर्भपातास कायदेशीररित्या परवानगी असलेल्या विकसित देशांमध्ये आणि आरोग्य सेवा पुरवठादार हे सुरक्षित सेवा पुरवण्यासाठी प्रशिक्षित आहेत तिथे गर्भपाताशी संबंधित मृत्यू कमी होतात. उदा. अमेरिकेत गर्भपात करून घेणाऱ्या प्रत्येकी एक लाख स्त्रियांमागे मृत्यूचे प्रमाण वार्षिक एकापेक्षा कमी आहे.

## गर्भपात सहज साध्य होण्यास प्रतिबंध केल्याने गर्भपातांची संख्या कमी होत नाही.

कायद्याने काहीही नमूद केलेले असले तरी जगातील प्रदेशांमध्ये तुलना केल्यास गर्भपातांचे प्रमाण जवळपास सारखेच आहे. गुटमाकर इन्स्टिट्यूटने १९७ देशांच्या केलेल्या सर्वेक्षणानुसार, गर्भपात सहज साध्य होण्यास प्रतिबंध केल्याने नको असलेला गर्भ काढून टाकण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्त्रियांची संख्या कमी होत नाही. (सिंग एट अल. २००९) कायदेशीर असो वा नसो, नको असलेली गर्भावस्था आणि गर्भपात होतच राहणार. जागतिक आरोग्य संघटनेने नमूद केले आहे की जगभरातील ३३ दशलक्ष गर्भनिरोधक वापरकर्त्यांना निरोधकांचा वापर करत असतानाही अपघाताने गर्भधारणा होते .

## गर्भपाताला कायदेशीर मान्यता दिल्यामुळे तो सुरक्षित होतो.

- स्त्रियांना सुरक्षित, कायदेशीर आणि वाजवी दरातील गर्भपात सेवा सहज उपलब्ध होतात तेव्हा असुरक्षित गर्भपातामुळे होणारे मृत्यू आणि विकृती मोठ्या प्रमाणावर घटतात. उदा. १९९६ साली दक्षिण आफ्रिकेत गर्भपाताच्या कायद्यामध्ये शिथिलता आणण्यापूर्वी असुरक्षित गर्भपातामुळे झालेल्या गुंतागुंतींसाठी सुमारे ४५,००० स्त्रियांवर दरवर्षी सार्वजनिक रूग्णालयांमध्ये उपचार केले जात होते. त्यातील सुमारे ४२५ जणींचा मृत्यू होत असे. (रीज एट अल १९९७). १९९४ ते २००१ या दरम्यान तेथे गर्भपाताशी संबंधित मातामृत्यूचे प्रमाण ९१ टक्क्यांवरून ४० टक्क्यांवर घसरले. (जेव्हस ॲण्ड रीज २००५)
- अत्यंत प्रतिबंधक गर्भपात कायदे असलेल्या देशांमध्ये प्रामुख्याने विकसनशील देशांमध्ये असुरक्षित गर्भपाताचे प्रमाण जास्त आहे. (सेडग एट अल २००७.) सुरक्षित, कायदेशीर गर्भपात सेवा सहज उपलब्ध नसल्याने स्त्रियांना स्वतःच निवडलेले उपाय करून अघोरी गर्भपात करावे लागतात. ते अनेकदा अप्रशिक्षित वैद्यकीय सेवाकर्त्यांकडून अस्वच्छ परिस्थितीत केले जातात.

## गर्भनिरोधक सहज उपलब्ध केल्यामुळे सुरक्षित, कायदेशीर गर्भपाताची गरज कमी होत नाही पण खर्च कमी होतो.

- जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, सुमारे ३३ दशलक्ष गर्भनिरोधकांचा वापर करणाऱ्या लोकांना दरवर्षी अपघाताने गर्भ राहिल्याचा अनुभव येतो. गर्भनिरोधकांचा योग्य पुरवठा आणि वापर केल्यावरही काही स्त्रिया अशा असतात ज्यांना एक किंवा अधिक गर्भपातांची गरज भासते.
- पुढील पाच वर्षांमध्ये सध्या पूर्ण न करण्यात आलेली कुटुंबनियोजनाची गरज पूर्ण करण्यात आल्यास भारत ३५ हजार मातामृत्यू आणि १२ लाख अर्भकांचे प्राण आणि ४४५० कोटी रूपये वाचवू शकतो. कुटुंब नियोजनाच्या सेवांशी सुरक्षित गर्भपात सेवा जोडल्या गेल्यास त्यातून ६५०० कोटी रूपयांची बचत होऊ शकते. (कुटुंब कल्याण मंत्रालय, आरएमएनसीएच- ए स्ट्रॅटेजी डॉक्युमेंट २०१३)

## प्रेरित गर्भपात ही एक अत्यंत सुरक्षित वैद्यकीय प्रक्रिया आहे.

- कौशल्यपूर्ण पुरवठादारांनी अचूक वैद्यकीय तंत्रज्ञान आणि औषधांचा वापर करून आणि आरोग्यपूर्ण परिस्थितींमध्ये गर्भपात केल्यास प्रेरित गर्भपात ही अत्यंत सुरक्षित वैद्यकीय प्रक्रिया आहे. (डब्ल्यूएचओ २०१२)
- वैज्ञानिक संशोधनांमधून हे दिसून आले आहे की, अचूकपणे वापर करण्यात आल्यास गर्भपाताच्या वैद्यकीय पद्धती (गोळ्यांद्वारे गर्भपात) गर्भावस्थेच्या सुरूवातीच्या काळात सुरक्षित आणि परिणामकारक आहेत. जागतिक आरोग्य संघटनेकडून वैद्यकीय गर्भपात हा पहिल्या तिमाहीतील गर्भावस्था टाळण्यासाठी सुरक्षित पद्धत असल्याचे सांगितले गेले आहे. (डब्ल्यूएचओ २००३, विनिकॅफ ॲट एल १९९७)
- १२ ते १४ आठवड्यांच्या गर्भावस्थेत शस्त्रक्रियेच्या साहाय्याने गर्भपात सूचित करण्यात आलेला आहे.

## विशिष्ट परिस्थितीत एका स्त्रीचा किंवा मुलीचा जीव वाचवण्यासाठी गर्भपात ही अत्यंत आवश्यक गोष्ट आहे.

- जगातील सुमारे ९४ टक्के देश एका स्त्रीचा जीव वाचवण्यासाठी गर्भपाताला परवानगी देतात (सिंग ॲट अल २००९.) एखाद्या स्त्रीला किंवा मुलीला गर्भावस्थेमुळे शारीरिक किंवा मानसिक आरोग्याला धोका असल्यास त्यापासून वाचवण्यासाठी वैद्यकीयदृष्ट्या आवश्यक गर्भपात केला जातो. बलात्कार किंवा बाळातील अपंगत्वासाठी देखील केला जातो.

***ज्योतीची कथा***

*ज्योती (हे खरे नाव नाही) एक १५ वर्षीय अविवाहित मुलगी असून ती महाराष्ट्रातील ग्रामीण भागात राहते. तिच्यावर कुटुंबातल्या एका व्यक्तीने बलात्कार केला आणि त्यामुळे ती गर्भवती राहिली. मुलीला लाजिरवाण्या परिस्थितीतून वाचवण्यासाठी ज्योतीच्या आईने तिला अनेक वैद्यकीय सुविधांमध्ये, सार्वजनिक आणि खासगी दोन्हींमध्ये योग्य गर्भपात सेवेच्या शोधात नेले.*

*परंतु प्रत्येकाने त्यांना नकार दिला. ज्योतीचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आहे आणि कायद्यानुसार कोणतीही बलात्काराची किंवा जबरदस्तीची घटना पोलिसांत नोंदवावी लागते. अनेक डॉक्टरांना त्यात सहभागी व्हायचे नव्हते. शेवटी या कुटुंबाने ही घटना पोलिसांत नोंदवली. परंतु त्यांचा डॉक्टरचा शोध संपला नाही कारण बलात्काराची घटना लोकांपुढे आल्यामुळे संपूर्ण कुटुंबाला समाजाकडून त्रास देऊन त्यांच्यावर ठपका ठेवला जात होता. ज्योतीच्या आईला एका डॉक्टरबाबत कळले जो तिला मदत करू शकत होता. तिने तिला त्याच्याकडे सल्ल्यासाठी नेले. तरूण मुलीला तपासल्यावर आणि वैद्यकीय तपासणी केल्यावर डॉक्टरने गर्भपात करून दिला.*

*ज्योती आणि तिचे कुटुंब बलात्काराचा आणि पोलिस तपासाचा सामना करत आहेत. त्या डॉक्टरने केलेल्या मदतीबाबत ते त्यांचे आभारी आहेत. गर्भावस्थेच्या सातव्या आठवड्यात सुरू झालेला हा शोध शेवटी १४ आठवड्यांच्या गर्भावस्थेत म्हणजे दुसऱ्या तिमाहीत संपला. याचा अर्थ पोलिसांनी या डॉक्टरची चौकशी तर केलीच कारण हा गर्भ बलात्कारामुळे राहिला होता आणि त्याला दुसऱ्या तिमाहीतील गर्भपातासाठी भारतीय कायद्यातील तरतुदीनुसार दुसऱ्या एका डॉक्टरचा सल्लाही घ्यावा लागला. भारतातील गर्भपात कायदा १९७२ साली अस्तित्वात आला होता. त्याला चार दशकांपेक्षा जास्त काळ लोटला आहे. परंतु ज्योतीच्या गोष्टीमुळे स्त्रिया आणि विशेषतः तरूण स्त्रिया, धोकादायक अवस्थेतील स्त्रियांना कायद्याने दिलेली सेवा मिळवण्यासाठी लढावे लागते हे दिसून येते.*